# <u>नियमित दिवाणी दावा क्र.६३/२०२६ मधील निशाणी क्र.४७ वरील आदेश</u>

(सारिका देवकर वि. सुनंदा देवकर वगैरे)

*****

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दिलेला आहे.

०२. वादी यांचे असे कथन आहे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द वाटप, पृथक कब्जा मिळणेबाबत व निरंतर ताकिदीबाबत दाखल केलेला आहे. सदरचा दावा दाखल करतेवेळी वादीचे सासरे कै.अशोक मारुती देवकर यांचे नांवावरील मौजे वेजेगांव येथील गट नं.२११ व ८८ या मिळकती दाव्याचे कामी समाविष्ट करणेने नजरचुकीने व अनावधानाने राहून गेलेले आहे. वादीचा दावा हा वाटपाचा असून वादी, प्रतिवादी यांच्या नांवावरील संपूर्ण मिळकती वाटपास पात्र असलेने सदर दाव्याचे कामी कोणतीही तांत्रिक अडचण राहू नये म्हणून वादीस खालीलप्रमाणे दावा दुरुस्ती करणे भाग पडत आहे. वादी करु इच्छित असलेली दुरुस्ती खालीलप्रमाणे वादीच्या दावा १अ कलम मध्ये अ.नं.६ म्हणजेच गट नं.२०४/१ याचे वर्णनानंतर "७" असा नवीन अंक लिहिणेत येवून त्यापुढे खालीलप्रमाणे मजकूर समाविष्ठ करणेस परवानगी असावी.

| | | | |
|---|---|---|---|
| ७) २११ | ०–२० | १–६३ | ०हे.०३.३४आर |
| ८) ८८ | ०–१४ | ०–१२ | ०हे.१२.२५आर समाईक |

असा नवीन मजकूर समाविष्ठ करणेस परवानगी असावी.

०३. तसेच दावा कलम ७) दाव्याची आकारणी कलमातील वरुन तिसऱ्या ओळीतील "आकार २०रु.३६ पैसे" या आकड्यास काट देणेत येवून त्याठिकाणी "२२रु.११ पैसे" असा नवीन अंक लिहिणेस परवानगी असावी. तसेच त्याच ओळीतील "१६२८रु.८० पैसे" या आकड्यास काट देणेत येवून त्याठिकाणी "१७६८रु.८० पैसे" असा नवीन अंक लिहिणेस परवानगी असावी. तसेच दाव्याची आकारणी या कॉलममधील वरुन अकराव्या ओळीतील "र.रु.२,४९,८००/– या

आकड्यास काट देणेत येवून त्याठिकाणी र.रु.२,५१,५७०/-" असा नवीन अंक लिहिणेस परवानगी असावी. वादीने मागणी केलेली दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची व प्रसंगानुरुप असून त्यामुळे दाव्याच्या मूळ स्वरुपामध्ये कोणताही मुलभूत बदल होत नाही. तसेच सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे काहीही नुकसान होत नाही. सबब, सदरचा अर्ज मंजूर करणेत येवून त्याप्रमाणे निशाणी क्र.१ मध्ये दुरुस्ती करणेस परवानगी असावी अशी त्यांनी विनंती केली.

०४. प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे वादीचे अर्जावर निशाणी क्र.५४ अन्वये म्हणणे दाखल केले असून सदर अर्ज व त्यासोबत दाखल केलेली कागदपत्रे प्रतिवादींना मान्य नाहीत. तसेच वादीने दावा दुरुस्तीसाठी दिलेल्या मिळकती व त्याचे क्षेत्र पाहता दावा मिळकती वाटपास पात्र होत नसल्याने दाव्यात दुरुस्ती वादीस मागता येत नाही. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करणेची मागणी त्यांनी केली आहे.

०५. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वादीचा अर्ज व प्रतिवादींचे त्यावरील म्हणणेचे अवलोकन केले. वादी यांनी अर्ज निशाणी क्र.४७ मध्ये वादीचे सासरे कै.अशोक मारुती देवकर यांचे मौजे वेजेगांव येथील गट क्र.२११ व ८८ या मिळकती दाव्यात समाविष्ट करणेची व त्यानुषंगाने दाव्यात इतर दुरुस्ती करणेची मागणी केलेली आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होत नाही. वादीने मागितलेली दुरुस्ती मंजूर केलेस या स्थितीला प्रतिवादींची कोणतीही हानी होईल असे दिसून येत नाही. याउलट प्रस्तुत दुरुस्तीद्वारे वादीचा दावा सुस्पष्ट होत आहे, तसेच तो गुणावगुणावर चालणेस मदत होणार आहे. तसेच दावा हा वाटपाचा असलेने त्यामध्ये सर्व मिळकती या सामील करणे आवश्यक व जरुरीचे ठरते. त्यामुळे सदरची दुरुस्ती मंजूर करणे न्यायोचित ठरेल या निष्कर्षाप्रत येऊन मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादी यांचा दुरुस्ती अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| २. | वादी यांनी उपरोक्त आदेशास अनुसरुन दाव्यात दुरुस्ती करुन अभिलेखावर दाव्याची दुरुस्त प्रत पुढील तारखेपर्यंत दाखल करावी. |

AVINASH RAMAKANT MALVADE

Digitally signed by AVINASH RAMAKANT MALVADE
Date: 2026.07.13 17:39:59 +0530

विटा. (अविनाश र. माळवदे)

दिनांक १३.०७.२०२६. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, विटा,

ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F file are same, word to word, as per the dictation.

| | |
|---|---|
| Name of Stenographer: | S.V. Gaikwad, (Grade-II) |
| Name of the Court - | Civil Judge, Senior Division, Vita |
| Date of pronouncement - | 13.07.2026 |
| Order signed by the Presiding Officer on - | 13.07.2026 |
| Order uploaded on - | 13.07.2026 |